सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकार्यालय**
(अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय)
वनभवन, रामगिरी रोड, पोलिस जिमखाना शेजारी, सिव्हिल लाईन्स, नागपूर -४४० ००१
दुसरा माळा, डीविंग, दूरध्वनी क्रमांक-०७१२-२५५६७८५,
Phone No : ०७१२-२५५६९१६ Email ID apccfnodal@mahaforest.gov.in

ईमेलने/स्पिडपोस्ट

विषयः वनजमीन-चंद्रपूर
चक फुटाणा ते चक नवेगांव आणि नवेगांव मोरे, प्रजिमा-११० या रस्त्याच्या कामासाठी, चंद्रपूर जिल्हयातील २.३४२७ हे. वनजमीन वळती करणे बाबत.

क्रमांक कक्ष-१७/नोडल/चंद्रपूर/आयडी-१४२०९/ 90 /२३-२४
नागपूर ४४० ००१ दिनांक 03/०४/२०२३.

संदर्भः १. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/चंद्रपूर/आयडी-१४२०९/३०७१, दि.१३.०२.२३.
२. शासन पत्र क्र. एफएलडी-३६२३/प्र.क्र.२९/फ-१०, दि.१५.०३.२०२३.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/चंद्रपूर/आयडी-१४२०९/३४८४, दि.२३.०३.२३.
४. आपले कार्यालयाचे पत्र क्र. मुख्य वनसंरक्षक (प्रा) चंद्रपूर यांचे कडील पत्र क्र. कक्ष-३(१)/जमिन/प्र.क्र.५७२/२२-२३/१४४२, दि.२८.०२.२०२३.

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.१ वरील पत्राचे अवलोकन होणेस विनंती आहे. सदर पत्रान्वये शासनाने दि.१०.०२.२०२३ चे पत्रान्वये १ ते ६ मुद्दे उपस्थित केले असून त्याअनुषंगाने आपणांस असे कळविण्यात आले होते की सदरच्या मुद्दयांची माहिती शासनास सादर करणे करिता या कार्यालयास सादर करावी.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.४ वरील पत्रान्वये सदरची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली.

सदर प्रस्तावास पर्यायीवनीकरण योजना लागू शकत नाही बाबत सोबत जोडण्यात आलेल्या केंद्र शासनाचे दि.१३.०५.२०११, दि.१६ ०६.२०११, दि.१७.०५.२०१३ चा अभ्यास करण्यात आला आणि दि.२८.०३.२०१९ चे पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या हँड बूक नुसार डाव्या विचारसरणी ने प्रभावित क्षेत्रातील (Left Wing Extremist ) तेरा (१३) प्रकल्पांची मुदत दि.३१.१२.२०२० पर्यंतच मुदत होती. सदरची मुदत वाढविण्यात आलेली नाही. या बाबत केंद्र शासनाचे नागपूर स्थित कार्यालयाशी संपर्क करून खात्री करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रस्तावांस पर्यायी वनीकरणाची योजना सादर करणे बंधनकारक आहे.

करिता आपणांस असे कळविण्यात येत आहे की सदर प्रस्तावांकरिता पर्यायी वनीकरणाचे क्षेत्राची निवड करणे, प्रकल्प यंत्रणेचे पर्यायी वनीकरणा संबंधी रक्कम भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र घेणे, पर्यायी वनीकरण

क्षेत्राची KML file संपूर्ण माहितीसह आणि पर्यायी वनीकरणाची १० वर्षांच्या योजनेसह परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास तीन प्रतीत सादर करावा.

तसेच सदर प्रस्ताव सादर करतांना जे वनक्षेत्र वळती करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे त्याच्या तपशीला नुसार KML file ज्यामध्ये कम्पार्टमेंट बाऊंड्री, गट/सर्व्हे बाऊंड्री, गावांचे नांव, रेंज, राऊंड, बीट, क्षेत्राची लांबी x रुंदी , क्षेत्रफळ चौ.मीटर आणि हेक्टर मध्ये या प्रमाणे सादर करावी.

3/4/23

**(नरेश झुरमुरे)**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा) चंद्रपूर